SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004 MAHARASHTRA
PHONE: EPBX - 2609000 FAX:0091-0231-2691533 & 0091-0231-692333
DLL 02312609091,2609135 Website : www.unishivaji.ac.inE-mail :affiliation.t2@unishivaji.ac.in
Website Conduit : (1) Affiliation→Affiliation T2 Circulars(2) Affiliation →Affiliation T2 Information Lists
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४ महाराष्ट्र
दूरध्वनी ईपीबीएक्स- २६०९०००, फॅक्स ००९१०२३१२६९१५३३ व ००९१०२३१६९२३३३
संलग्नता टी २ विभाग थेट दूरध्वनी क्र. ०२३१ २६०९०९१,२६०९१३५

Estd. 1962
"A++" Accredited
by NAAC(2021)
With CGPA 3.52

जा.क्र. संलग्नता/टी-२/शा.टे/आ.चा.कौ.वि.केंद्र/ No - 1618-A दि. 26 JUN 2024

प्रति,
मा. प्राचार्य / संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

# परिपत्रक

विषय:- आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्राबाबात.

महोदय / महोदया,

महाराष्ट्र शासन कौशल्य,रोजगार,उद्योजकता व नाविन्यता विभाग महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी यांचेकडील प्राप्त पत्रानुसार नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये व्यावसायिक शिक्षणाला महत्व देण्यात आलेले आहे.त्या धोरणाच्या आंमलबजावणीला सकारत्मक वातावरण निर्मिती होण्यासाठी तसेच युवक - युवतीना कौशल्य विकासाची संधी महाविद्यालया मध्ये उपलब्ध करुन देण्यासाठी. महाराष्ट्र शासनाने **"आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र"** ही नाविन्यपूर्ण योजना सुरु केली आहे.आपल्या महाविद्यालयामध्ये कौशल्य प्रशिक्षण स्थापन करुन १५ ते ४५ वयोगटातील युवक-युवतीना कौशल्य विकास प्रशिक्षण प्रदान करुन त्यांना आपल्या पायावर उभे राहण्यासाठी रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध होऊ शकतात. याकरीता केंद्रशासनामार्फत निश्चित केलेल्या COMMON COST NORMS नुसार कौशल्य विकास केंद्राला विविध टप्यामध्ये प्रत्येक प्रति प्रशिक्षणार्थी सरासरी रुपये ९,०००/- ते १५,०००/- पर्यत प्रशिक्षण शुल्क अदा करण्यात येते.

महाराष्ट्र शासनाच्या संकल्पनेतून महाविद्यालयामध्ये **"आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र"** स्थापन करावे. याकरीता गुगल फॉर्म तयार करण्यात आला असून त्याद्वारे आपल्या महाविद्यालयामध्ये **"आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र"** स्थापन करावयासाठी अर्ज करावयाचा आहे.त्याचप्रमाणे कौशल्य विकास प्रशिक्षण देण्यासाठी FUTURE SKILL JOB या प्राधान्याने विचार व्हावा.

अधिक माहितीसाठी महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास योजनेसाठी कार्यालयातील श्री विजय काटोलकर कौशल्य अधिकारी - १ आणि श्री. श्रीजन तायडे यंग प्रोफेशनल यांचेशी संपर्क साधावा
ई-मेल - (smola@mssds/in / ypf.shrijan@gmail.com) **दूरध्वनी क्रमांक : ०२२-२२६२५६५१/५३**

कळावे,

आपला विश्वासू
PSPandav
(डॉ. पी.एस.पांडव )
उपकुलसचिव
संलग्नता टी/२ विभाग

टिप : सोबत महाराष्ट्र शासन कौशल्य, रोजगार,उद्योजकता व नाविन्यता विभाग यांचे माहितीपत्रक जोडले आहे.त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करावी.

सत्यमेव जयते | महाराष्ट्र शासन | कौशल्यम् बलम् | MSSDS

## महाराष्ट्र शासन
## कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग

### महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी

*महाविद्यालयांतर्गत*


# आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र

https://www.mahaswayam.gov.in/

gom_seeid

gom_seeid



कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत पहिल्या टप्प्यात राज्यातील 110 आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्रांचे दृकश्राव्य प्रणालीद्वारे ऑनलाईन उदघाटन दि.13 मार्च 2024 रोजी मा. उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीच्या आयुक्त निधी चौधरी, यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच, दृकश्राव्य प्रणालीद्वारे 110 महाविद्यालयातील विद्यार्थी आणि प्राचार्य यावेळी उपस्थित होते.

# आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र

रोजगाराबाबत बदलत्या राष्ट्रीय व आतरराष्ट्रीय परिस्थितीत कौशल्य विकास व उद्योजकतेस अधिक प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्य शासनाने माहे जानेवारी 2015 मध्ये स्वतत्र कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाची स्थापना केली आहे.

बेरोजगार उमेदवारांना विविध क्षेत्रामधील रोजगार उपलब्ध करुन देणे, स्वयंरोजगार करु इच्छिणा-या उमेदवारांना अर्थसहाय्य प्रदान करणे, कौशल्य विकास प्रशिक्षणाच्या माध्यमातून उमेदवारांना रोजगारक्षम बनविणे ही सध्याच्या काळाची गरज पूर्ण करण्याच्या हेतूने, राज्य शासनाच्या तसेच केंद्र शासनातील विविध विभागांतर्गत कौशल्य विकास प्रशिक्षणाशी निगडीत सर्व योजना व कार्यक्रमाखाली निधीची सांगड घालून एकात्मिक अंमलबजावणीद्वारे कार्यप्रवण वयोगटातील (15-45) वर्षापर्यंतच्या वयोगटातील) उमेदवारांचे, अधिक मागणी असलेल्या क्षेत्राच्या आवश्यकतेनुसार व्यावसायिक कौशल्य विकास (SKILL DEVELOPMENT), कौशल्य वर्धन (UP-SKILLING), पुनर्कौशल्य विकास (RESKILLING) करण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी मार्फत केंद्र, राज्य व जिल्हा पुरस्कृत विविध कौशल्य विकास प्रशिक्षण योजनांच्या माध्यमातून राज्यातील 15 ते 45 वयोगटातील युवक-युवतींना विविध 37 क्षेत्रामध्ये (बँकिंग, माहिती तंत्रज्ञान, बांधकाम, ईलेक्ट्रॉनिक्स, रिटेल, वित्त इ.) कौशल्य प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगारक्षम बनवून रोजगार अथवा स्वयरोजगाराच्या संधी पुरविण्यात येतात.

National Skills Qualification Framework (NSQF) अन्वये स्थापित मानकांनुसार 1900 पेक्षा अधिक व्यावसायिक अभ्यासक्रमाचे संबंधित प्रशिक्षण संस्थांमार्फत उमेदवारांना प्रशिक्षण देण्यात येत असून सदर कौशल्य प्रशिक्षण National Credit Framework (NCrF) प्रणालीशी निगडीत आहे. प्रशिक्षणाअंती उमेदवाराचे मूल्यमापन (Assessment) आणि प्रमाणीकरण (Certification) हे केंद्र शासनाच्या National Council for Vocational Education Training-NCVET, National Skill Development Corporation-NSDC आणि Sector Skill Councils (SSC) कडील

मान्यताप्राप्त मूल्यमापन संस्था (ASSESSING BODY) मार्फत तसेच महाराष्ट्र राज्य कौशल्य व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळा (MSBSVET) मार्फत करण्यात येते. सदर प्रमाणपत्र राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यताप्राप्त असून ह्या अभ्यासक्रमांमध्ये VERTICAL व HORIZANTAL MOBILITY अंतर्भूत आहे.

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२० मध्ये व्यावसायिक शिक्षणाला महत्व देण्यात आलेले आहे. त्या धोरणाच्या अंमलबजावणीला सकारात्मक वातावरण निर्मिती होण्यासाठी तसेच, युवक- युवतींना कौशल्य विकासाची संधी महाविद्यालयामध्ये उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र शासनाने "आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र" ही नाविन्यपूर्ण योजना सुरु केली आहे. आपल्या महाविद्यालयात कौशल्य प्रशिक्षण केंद्र स्थापन करून 15 ते 45 वयोगटातील युवक-युवतींना कौशल्य विकास प्रशिक्षण प्रदान करून, त्याना आपल्या पायावर उभे राहण्यासाठी रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध होऊ शकतात.

या करीता केंद्र शासनामार्फत निश्चित केलेल्या COMMON COST NORMS नुसार कौशल्य विकास केंद्राना विविध टप्प्यांमध्ये प्रती प्रशिक्षणार्थी सरासरी रु. 9000 ते 15000 /- पर्यंत प्रशिक्षण शुल्क अदा करण्यात येते.

इच्छुक महाविद्यालयांमध्ये "आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र"स्थापन करण्याचा राज्य शासनाचा मनोदय आहे. या करीता गुगल फॉर्म लिंक तयार करण्यात आली असून त्याद्वारे आपल्या महाविद्यालयामध्ये "आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र" स्थापन करण्यासाठी अर्ज करावयाचा आहे. त्याचप्रमाणे कौशल्य विकास प्रशिक्षण देण्यासाठी FUTURE SKILL JOB ROLES चा प्राधान्याने विचार व्हावा, अशी अपेक्षा आहे.

## प्रशिक्षण शुल्क अदा करण्याचे टप्पे:

प्रशिक्षण शुल्काची निश्चिती केंद्र शासनाने निर्गमित केलेल्या COMMON COST NORMS (CCN) च्या मार्गदर्शक सुचनांप्रमाणे होईल व प्रशिक्षण शुल्क प्रमोद महाजन कौशल्य विकास व उद्योजकता विकास अभियानाच्या (PMKUVA) मार्गदर्शक सुचनाप्रमाणे ACKVK यांना खालीलप्रमाणे अदा करण्यात येईल.

1. प्रशिक्षण सुरु झाल्यावर - 30%
2. 50% प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर, या 50% प्रशिक्षण दिवसामध्ये AEBAS वर 70% उपस्थिती नोंदविलेल्या उमेदवारांच्या सख्येच्या प्रमाणात. - 30%
3. प्रमाणीकरण झाल्यानंतर (फक्त पास उमेदवारांच्या सख्येच्या प्रमाणात) - 40%
4. पुनर्मूल्यमापनात पास झालेल्या उमेदवारांच्या संख्येच्या प्रमाणात - उर्वरित

2.1. PMKVY 4.0 च्या धर्तीवर प्रमोद महाजन कौशल्य विकास व उद्योजकता विकास अभियानाच्या (PMKUVA) मार्गदर्शक सुचनांप्रमाणे ACKVK यांना खालीलप्रमाणे प्रती तास, प्रती उमेदवार प्रशिक्षण शुल्क अदा करण्यात येईल
CATEGORY- I - RS. 32.24/-
CATEGORY- II - RS. 27.72/-
CATEGORY- III - RS. 23.16/-

उदा. प्रती प्रशिक्षण तुकडी 30 उमेदवार CATEGORY-I मध्ये अंतर्भूत अभ्यासक्रमाकरीता ग्राह्य धरल्यास प्रशिक्षण शुल्क आकारणी खालीलप्रमाणे
CATEGORY-I - RS. 32.24
COURSE DURATION- 500 HRS
TRAINING BATCH- 30 CANDIDATES
BATCH COST= RS. 32.24 X 500 X 300 = RS.4,83,600
1ST MILESTONE OF 30%- RS. 1,45,080
2ND MILESTONE OF 30%- RS. 1,45,080
3RD MILESTONE OF 40%- RS. 1,93,440

# आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र स्थापन करण्याची प्रक्रिया

STEP 1 — आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र (ACKVK) करिता गुगल फॉर्मवर इच्छुकता नोंदवणे.

STEP 2 — राज्य कार्यालयामार्फत प्राप्त प्रस्तावांची छाननी करणे.

STEP 3 — छाननी झालेल्या महाविद्यालयांची यादी जिल्हा कार्यालयांना कळविणे.

STEP 4 — जिल्हा कार्यालयामार्फत महाविद्यालयांशी सामंजस्य करार करणे.

STEP 5 — महाविद्यालयांमार्फत स्किल इंडिया डिजिटल हब पोर्टलवर ट्रेनिंग पार्टनर TP नोंदणी प्रक्रिया करणे.

STEP 6 — ट्रेनिंग पार्टनर नोंदणी झाल्यानंतर लॉगिन मधून TC (TRAINING CENTRE) क्रिएट करणे.

STEP 7 — संबंधित TC मध्ये CAAF (CENTRE ACCREDITATION APPLICATION) फॉर्म भरणे.

STEP 8 — CENTER INSPECTION करून घेणे.

STEP 9 — वर्क ऑर्डर साठी जिल्हा कार्यालयात LOR (LETTER OF RECOMMENDATION ) सादर करणे.

STEP 10 — जिल्हा कार्यालयामार्फत महाविद्यालयांना वर्क ऑर्डर देणे.

# आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र स्थापन करण्याची प्रक्रिया

**STEP 11** — सेक्टर स्किल काउन्सिल मार्फत TOT (TRAINING OF TRAINERS) करून घेणे.

**STEP 12** — AADHAR ENABLED BIOMETRIC ATTENDANCE SYSTEM मशीन खरेदी करून इंटिग्रेट करणे.

**STEP 13** — महास्वयम पोर्टल वर TC (TRAINING CENTRE) ने प्रोफाइल क्रिएशन साठी रिक्वेस्ट टाकणे.

**STEP 14** — प्रोफाइल क्रिएट झाल्यानंतर ANNUAL ACTION PLAN भरणे.

**STEP 15** — ANNUAL ACTION PLAN अप्रूव्ह झाल्यानंतर बॅचेस तयार करणे.


**STEP 16** — जिल्हा कार्यालयाने बॅचेस READY TO START करणे.

**STEP 17** — MSSDS कार्यालयाने TBN (TRAINING BATCH NO) देणे.

**STEP 18** — प्रशिक्षण सुरु असताना बायोमेट्रिक हजेरी.

**STEP 19** — ACKVK मार्फत टप्पेनिहाय देयक अपलोड करणे.

**STEP 20** — ऑनलाईन प्रशिक्षण शुल्क अदा करणे.




## आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र उपक्रमाचे ध्येय..!

1. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, 2020 मधील व्यवसायिक शिक्षणाचे महत्त्व ओळखून महाविद्यालयातील युवक युवतींना कौशल्य प्रशिक्षण प्रदान करणे
2. राज्यातील युवक-युवतींना परदेशामध्ये रोजगार उपलब्ध व्हावा यासाठी आवश्यक तंत्रज्ञानाचे कौशल्य प्रशिक्षण प्रदान करणे
3. कालसुसंगत तंत्रज्ञानाचे कौशल्य प्रशिक्षण महाविद्यालयीन युवक युवतींना प्रदान करून त्यांना रोजगारक्षम करणे
4. INDUSTRY 4.0 साठी प्रशिक्षित मनुष्यबळ तयार करणे

# महाविद्यालयांनी ACKVK स्थापन करण्यासाठी खालील QR कोड स्कॅन करून इच्छुकता नोंदवावी

## अधिक माहितीसाठी (Knowledge Bank) खालील QR कोड स्कॅन करावा

अधिक माहितीसाठी महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी कार्यालयातील
श्री. विनय काटोलकर, कौशल्य अभियान अधिकारी-१ आणि
श्री. श्रीजन तायडे, यंग प्रोफेशनल, यांचेशी संपर्क साधावा.
ई-मेल आयडी- (smo1a@mssds.in / ypf.shrijan@gmail.com)
दूरध्वनी क्र- 022-22625651/53